# लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबेडकर व पंडित नेहरू यांची लोकशाहीची संकल्पना

**प्रा.मदन पाडवी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
मुधोजी महाविद्यलाय ,फलटण
mpadvi915@gmail.com\

**गोषवारा:**

भारत व एक संसदीश धर्म लोकशाही प्रजासत्ताक आहे.ज्यामध्ये भारताचे राष्ट्रपती हे राज्याचे प्रमुख साठी भारताचे प्रथम नागरिक आहेत व आताचे पंतप्रधान हे सरकारचे प्रमुख आहेत. हा शब्द जरी राज्यघटीत वापरला जात असला तरी सरकारच्या संघीयसंरचनेवर आधारित आहे.म्हणुनच आपल्या भारतातील राजकीय विचारवंताची लोकशाहीबद्दलची संकल्पना अतिशय अभुतपूर्व आाहे.

पारिभाषिक शब्द: राजकीय लोकशाही,सामाजिक लोकशाही,ग्रामाधिष्टित लोकशाही.

**प्रस्तावना:**

लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे .तो राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पंडित नेहरू यांची लोकशाहीची संकल्पना मला अत्यंत समर्पक वाटते. लोकशाहीची संकल्पना आता कुठेतरी लुप्त होत चालली आहे.म्हणुनच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू यांची लोकशाहीची संकल्पना मला अत्यंत अमुल्य वाटते म्हणूनच हा उद्देश डोळयासमोर ठेवून मी हा शोध निबंध लिहित आहे.

**विषय विश्लेषण**:

डॉ. आंबेडकर यांच्या मते, लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याद्वारा रक्तपाताशिवाय मूलगामी क्रांतिकारक बदल घडवून झागता येतात अशा शासनाची धडा किंवा पदधती म्हणजे लोकशाही होय. पंडित नेहरू यांच्या मते, लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून ती एक जीवनप्रणाली आहे.भारत एक लोकशाही प्रजासत्ताक आहे.ज्यामध्ये भारताचे राष्ट्रपती हे राज्याचे प्रमुख साठी भारताचे प्रथम नागरिक आहेत व आताचे पंतप्रधान हे सरकारचे प्रमुख आहेत. हा शब्द जरीराज्यघटनेत वापरला जात असला तरी सरकारच्या संघीयसंरचनेवर आधारित आहे.म्हणुनच आपल्या भारतातील राजकीय विचारवंताची लोकशाहीबद्दलची संकल्पना अतिशय अभुतपूर्व आाहे. भारताने लोकशाही व्यवस्थेचा पर्याय निवडला आहे,कारण त्याला सार्वभौम सत्ता प्रत्येक भाषा, समुदाय आणि धर्मासाठी समान दर्जा मिळण्यासाठी लोकांच्या हातात दयायची होती. आणि ही लोकशाही सत्यात उतरवण्यासाठी महात्मा गांधी,पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक यांच्यासारख्या राजकीय विचारवंतांचा मोलाचा वाटा आहे.तसे पहायला गेले तर, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते जवाहरलाल नेहरू के भारताचे पहिले पंतप्रधान बनले,परंतु स्वातंत्र्यलढ्याशी सर्वाधिक संबंधित असलेल नेते ,महात्मा गांधी यांनी कोणतेही पद स्वीकारले नाही.मध्ये स्वीकारलेल्या राज्यघटनेने भारताला लोकशाही देश बनवले आणि तेव्हापासून ही लोकशाही टिकून आहे.1950 स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकीय विचारवंतांनी काही विचार मांडले होते,ते पुढिलप्रमाने आहेत.

१) महात्मा गांधींच्या मते, स्वतंत्र भारतात लोकांच्या संमतीने चालणारे सरकार असले पाहिजे. आपली संमती लोकांनी आस्तीत जास्त दर्शविली पाहिजे. जे राष्ट्राची परिश्रमपूर्वक सेवा करत असतील मतदारांच्या यादीत आपले नाव नोंदविले आहे.स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार असेल. बहुमताने आणि ज्यांनी अशा सर्व महात्मा गांधीजींचे सारे राजकारण अध्यात्माच्या अधिष्ठानावर आधारलेले होते. कारण त्यांची आत्मबलात अपार श्रद्धा होती.महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा, समता, न्याय या तत्त्वांचा अंगीकार करून राजकारण केले.त्यांच्या मते - प्रतिपक्षाचे डोके उडविण्यापेक्षा त्याच्या डोक्यातील विचार बदली व त्याला आपल्या मताकडे वळविणे हे लोकशाहीचे मुख्य सूत्र होय.महात्मा गांधीजींचे सारे राजकारण अध्यात्माच्या अधिष्त्नावर आधारलेले होते. कारण त्यांची आत्मबलात अपार श्रद्धा होती.महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा, समता, न्याय या तत्त्वांचा अंगीकार करून राजकारण केले

त्यांच्या मते - प्रतिपक्षाचे डोके उडविव्यापेक्षा त्याच्या डोक्यातील विचार बदली व त्याला आपल्या मताकडे वळविणे हे लोकशाहीचे मुख्य सूत्र होय.

2) पंडित नेहरू यांनीकेवळ संसदीय लोकशाहीचा पुरस्कार, राजकीय लोकशाही अभिप्रेत होती, असे नाही, तर राजकीय लोकशाहीतून परिपूर्ण लोकशाही निर्माण करावयाची होती. नेहरूंची लोकशाही व्यवस्थेवर नितांत श्रद्धा होती. |पंडित नेहरू यांनी लोकशाही ही केवळ एक शासनपदधती न मानता ती एक जीवनप्रणाली मानली होती. राजकीय पक्षाचा साधन म्हणून स्वीकार करून जनतेच्या पाठिंब्यावर व टीकेवर चालणारी लोकशाही पदधती त्यांना अभिप्रेत होती. खरच पं. जवाहरलाल नेहरू यांची लोकशाही बद्दलची संकल्पना दिशादर्शक वाटते.

3) डॉ बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, लोकशाहीचे पुरस्कर्ते,

सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे प्रमुख प्रणेते, दलितांचे कैवारी असा ज्यांचा उल्लेख होतो ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीबददल आपले विचार व्यक्त केलेले आहेत. भारतीय समाजातील पारंपारिक विषमता नष्ट करण्यासाठी तिच्यात करावयाचे आमुलाग्र बदल म्हणजे सामाजिक लोकशाहीची निर्मिती, असे डॉ. आंबेडकर म्हणतात. कारण या पारंपारिक समाज रचनेत बदल न करता, लोकशाहीची इमारत उभी केल्यास ती पाया नसलेल्या इमारतीप्रमाने कोसळून पडेल याबाबत कोणतेही शंका नाही,ते असे म्हणत.डॉ आंबेडकरांच्या मते "लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्तविरहित मार्गानी आणणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही होय.

**निष्कर्ष:-**

भारतातील राजकीय विचारवंतान जी लोकशाहीबद्दलची संकल्पना मांडली ती उल्लेखनीय आहे, हे आपल्याला आढळून आले. पंडित नेहरू, लोकमान्य टिळक, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आपल्याला जाणवते की यांच्या विचारांतून भारतीय लोकशाहीला किती अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

**संदर्भ :-**

१) पा. वा. गाडगीळ : शांतिदूत नेहरू
२ ) संपादक, अजित वर्टी, दिवाकर गधे :
'लोकमान्य' (म. गांधीजींचा 125 वी जयंती
समारोह विशेषक, ऑक्टोबर, 1993)
३)संपादक मंडळ, महाराज्य राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1993 :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ
4) संपादक रावळी टी . ए.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, गवळी
प्रकाशन, कोल्हापूर (प्रथमावृत्ती, 1991)
5) संपादक, बी. सी. कांबळे
19 भारतीय घटनेची मीमांसा (प्रथमावृत्ती, 1966)